आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- गुजरातमध्ये ९ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विकास योजनांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन आणि उद्घाटन

- X S I O इंडस्ट्री, ब्लॅकस्टोन कंपनी आणि महाराष्ट्राचा उद्योग विभाग यांच्यात 3 हजार कोटी रुपयांचे करार

- पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची पहिल्या डावात नाममात्र आघाडी तर दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डावही गडगडला

**आणि**

- जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या इशा सिंगची २५ मीटर एअर पिस्तुल प्रकारात कांस्यपदकाची कमाई

**<><><><><>**

आदिवासींची अस्मिता हजारो वर्षांच्या भारतीय जाणीवांचा अविभाज्य भाग आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वातंत्र्यसैनिक आणि आदिवासी समुदायाचे नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त गुजरातमधल्या नर्मदा जिल्ह्यातल्या देडियापाडा इथं एका कार्यक्रमात मोदी बोलत होते. यावेळी ९ हजार ७०० कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या विकास योजनांचं भूमिपूजन आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. या विकास योजनांच्या माध्यमातून या भागातल्या आदिवासी समाजाला शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्या जाणार आहेत. स्वातंत्र्यांच्या लढाईतल्या आदिवासींच्या योगदानाविषयी मोदी म्हणाले…

**होल्ड… बाईट - नरेंद्र मोदी**

सिकल सेल आजाराचा सामना करण्यासाठी आदिवासी भागांमध्ये आरोग्य केंद्रं, रुग्णालयांची संख्या वाढवण्यात आली आहे. हा आजार रोखण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर मोहीम सुरू असल्याचंही मोदी यांनी सांगितलं.

या कार्यक्रमापूर्वी सकाळी मोदी यांनी सुरत इथं मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल कॉरिडॉरच्या बुलेट ट्रेन स्थानकाच्या कामाची पाहणी केली तसंच अधिकाऱ्यांशी संवाद साधला. तत्पूर्वी त्यांनी सागबारा तालुक्यातल्या देवमोगरा गावात कुलदेवी पंडोरी मातेच्या मंदिरात प्रार्थना केली.

<><><><><>

आदिवासी संस्कृती जपण्यासाठी सरकारनं अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे आणि अनेक नव्या योजना आखल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात दिली. स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीचं औचित्य साधून आयोजित राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. महाराष्ट्रात एक कोटी २५ लाख आदिवासी असून १६ जिल्ह्यात त्यांच्या ४५ जमाती आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. आदिवासींना जल, जमीन आणि जंगलापासून न तोडता त्यांना संरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

बिरसा मुंडा यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी देशभरात आज आदिवासी गौरव दिवस साजरा झाला. आजचा दिवस आदिवासी संस्कृतीच्या गौरवशाली इतिहासाचं महत्व अधोरेखित करतो. या निमित्तानं देशभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रदर्शनं आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी भगवान बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

X S I O इंडस्ट्री, ब्लॅकस्टोन आणि महाराष्ट्राचा उद्योग विभाग यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज ३ हजार कोटी रुपयांच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. गुंतवणुकीची ही रक्कम ३ हजार कोटींनी वाढवून ८ हजार कोटी करण्यात येईल, अशी घोषणा X S I O इंडस्ट्री आणि ब्लॅकस्टोन कंपनीच्या वतीनं करण्यात आली. ३ हजार कोटींच्या गुंतवणूकीमुळे राज्याच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते X S I O इंडस्ट्रीयल एँड लॉजिस्टीक पार्कचं भूमीपूजन करण्यात आलं. समृद्धी महामार्गालगतच X S I O हा ७०० कोटी गुंतवणूकीचा जागतिक दर्जाचा पार्क उभारला आहे. तसंच १०५ एकरावरील दुसऱ्या टप्प्यातील अकराशे कोटी गुंतवणुकीच्या उद्देशाने तयार करण्यात येणाऱ्या लॉजिस्टिक पार्कचं भूमिपूजन आज झालं. यामुळे जवळपास १० हजार रोजगार निर्माण होणार आहेत, असं मुख्यमंत्री म्हणाले. उद्योग क्षेत्रातील वस्तूंना देशांतर्गत तसंच जागतिक स्तरावर पोचवण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा सुरू झाल्यापासून ४६ कोटी गणना अर्ज वाटप झाल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. उत्तरप्रदेशात सर्वाधिक १३ कोटी ७४ लाख अर्जांचं वाटप झालं आहे. तर पश्चिम बंगालमधे ७ कोटी ४ लाख गणना अर्ज वाटण्यात आले आहेत. या टप्प्यात ९ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधे मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण होणार आहे.

**<><><><><>**

कोलकात्यात इडन गार्डन इथं सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ आज संपला तेव्हा दक्षिण आफ्रिकेनं दुसऱ्या डावात ७ बाद ९३ धावा केल्या होत्या. त्याआधी दक्षिण आफ्रिकेच्या १५९ धावांच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय संघानंही पहिल्या डावात केवळ १८९ धावांपर्यंतच मजल मारल्यानं भारताला अवघ्या ३० धावांची आघाडी मिळाली. भारताचा कर्णधार शुभमन गिल दुखापतीमुळे ४ धावांवर माघारी परतला. त्यानंतर दुसऱ्या डावात फिरकीपटू रवींद्र जडेजानं २९ धावात ४ गडी बाद केल्यानं दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावातही ठराविक अंतरानं पडझड होत गेली. मात्र, कर्णधार टेम्बा बावुमाने एका बाजूने संयमी फलंदाजी करत नाबाद २९ धावा केल्यानं भारताला दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव झटपट गुंडाळता आला नाही.

**<><><><><>**

कैरो इथं सुरू असलेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेत आज भारताच्या इशा सिंगनं महिलांच्या २५ मीटर एअर पिस्तुल प्रकारात ३० गुणांसह कांस्यपदकाची कमाई केली. कोरियाच्या यांग जिननं ४० गुणांसह सुवर्णपदकं पटकावलं. तर चीनच्या याओ

क्विआनझुननं ३८ गुणांसह रौप्य पदक मिळवलं. भारताला आत्तापर्यंत या स्पर्धेत तीन सुवर्ण, पाच रौप्य तर दोन कांस्य पदकं मिळाली असून तो तिसऱ्या स्थानावर आहे.

<><><><><>

यंदाच्या फिडे बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीसाठी ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगसी पात्र ठरला आहे. या फेरीसाठी पात्र ठरलेला तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. दोन वेळा जेतेपद मिळवणाऱ्या लेव्हॉन अरोनियन याचा गोव्यात अर्पोरा इथं त्याने आज पराभव केला. यापूर्वी पेंटाला हरिकृष्णन हा भारतीय बुद्धिबळपटू विश्वचषकाच्या पाचव्या फेरीपर्यंत पोचला.

<><><><><>

लाल किल्ला मेट्रो स्थानकाचे दोन आणि तीन क्रमांकाचे फाटक प्रवाशांसाठी उघडण्यात आले असल्याची माहिती दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशननं दिली आहे. या स्थानकाजवळ एका कारमध्ये स्फोट झाल्यानंतर हे फाटक बंद करण्यात आले होते.

<><><><><>

राजस्थानातल्या सिरोही जिल्ह्यातल्या एका दुर्गम गावात अमली पदार्थ नियंत्रण विभागानं पोलिसांच्या सहकार्यानं एका छुप्या प्रयोगशाळेवर छापा घातला. या संयुक्त मोहीमेत पाचजणांना अटक झाली आहे. प्रयोगशाळेतून मेफेड्रोन तयार करण्यासाठी लागणारं अनेक किलो रसायनं जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत ४० कोटी रूपये आहे. अशा प्रकारच्या देशात इतरत्र असलेल्या प्रयोगशाळांची माहिती त्या त्या जिल्ह्यातल्या पोलिसांना पाठवण्यात आली आहे.

<><><><><>

भारतीय हवाई दलाची ३ विमानं अज्ञात इलेक्ट्रॉनिक हस्तक्षेपामुळे दोन तासांच्या कालावधीत कोसळल्याचा पाकिस्तान समर्थक समाज माध्यमाचा दावा केंद्रसरकारनं फेटाळला आहे. पत्रसूचना कार्यालयाच्या फॅक्ट चेक युनिटनं हा दावा खोटा असल्याचं घोषित केलं असून, प्रत्यक्षात, भारतीय हवाई दलाचं प्रशिक्षण विमान आपल्या नियमित सरावादरम्यान कोसळल्याचं भारतीय हवाई दलानं अधिकृतपणे स्पष्ट केल्याचं यात म्हटलं आहे. या अपघातात नागरी मालमत्तेचं कोणतंही नुकसान झालं नाही असं भारतीय हवाई दलानं स्पष्ट केलं आहे.

नागरिकांनी अशा माहितीपासून सावध राहावं, आणि त्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी अथवा त्याचा प्रसार करण्यापूर्वी अधिकृत सूत्रांकडून त्याच्या सत्यतेची पडताळणी करावी, असं आवाहन सरकारनं केलं आहे.

<><><><>

सर्जनशीलता आणि तंत्रज्ञानाचा संयोग ही येत्या इफ्फी २०२५ ची संकल्पना असल्याचं गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितलं. ते आज पणजी इथं आगामी ५६ व्या इफ्फीच्या पार्श्वभूमीवर आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते. येत्या २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान पणजीत इफ्फी  महोत्सव रंगणार आहे. या सोहळ्याला ८० देशांतले चित्रपटनिर्माते भेट देणार असून देश विदेशातले २७० हुन अधिक चित्रपट एकत्र येणार आहेत. भारतीय चित्रपट सृष्टीतल्या योगदानाबद्दल गुरुदत्त, राज खोसला, भानुमती, भुवन, रित्विक तसंच रजनीकांत आणि बालकृष्ण यांचा या महोत्सवात गौरव करण्यात येणार असल्याचं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ एल मुरुगन यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

देशाच्या भांडवली बाजारावर गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत असल्याचं सेबी अर्थात भारतीय शेअर आणि रोखे नियामक मंडळाचे अध्यक्ष तुहीन कांत पांडे यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा २०२५ मध्ये बोलत होते. भारतात १३ कोटी ६० लाखांहून अधिक गुंतवणूकदार असून २१ कोटींहून अधिक डी मॅट खाती असल्याचं सांगत यावरून गुंतवणूकदारांचा विश्वास दिसून येत असल्याचं त्यांनी नमूद केलं. दररोज सुमारे एक लाख नवीन डी मॅट खाती उघडली जात असल्याचंही त्यांनी सांगितलं. म्युच्युअल फंडांमध्ये ८० लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झाली असून यामुळे एका दशकात सुमारे सात पट वाढीची नोंद झाल्याचं पांडे यांनी सांगितलं.

<><><><>

भारतीय हवाई दल उद्यापासून फ्रान्समध्ये होणाऱ्या आठव्या  ‘गरुड-25’ या द्विपक्षीय हवाई सरावात  सहभागी होणार आहे. भारतीय हवाई दल येत्या २७ नोव्हेंबर पर्यंत फ्रेंच हवाई आणि अंतराळ दलाबरोबर या सरावात सहभागी होत आहे. वास्तववादी वातावरणात युद्ध तंत्र आणि प्रक्रियेमध्ये सुधारणा करणं, हे या सरावाचं उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

या सरावांमुळे दोन्ही देशांच्या हवाई दलांना व्यावसायिक परस्पर संवाद, परिचालनाबाबतचं ज्ञान, आणि परस्परांच्या सर्वोत्तम पद्धतींची देवाण-घेवाण करण्याची संधी मिळेल, असं यात म्हटलं आहे.

या सरावादरम्यान, भारतीय हवाई दलाची सुखोई-30MKI लढाऊ विमानं फ्रेंच मल्टीरोल लढाऊ विमानांबरोबर हवेतून हवेत मारा करणं, हवाई प्रतिरोध आणि संयुक्त स्ट्राइक ऑपरेशन्सवर लक्ष केंद्रित करत, जटिल हवाई  युद्धाचा सर्व करतील, असं यात म्हटलं आहे.

//<><><><><>//